रावसाहेब दानवे यांची दोन्ही मुले आता विधानसभेत

संतोष दानवे भोकरदनमधून तर कन्नडमध्ये संजना जाधव विजयी

छत्रपती संभाजीनगर : भाजपचे निवडणूक प्रमुख रावसाहेब दानवे यांचे चिरंजीव संतोष दानवे हे भोकरदनमधून १ लाख २८ हजार ४८० मतांनी विजयी झाले तर कन्या संजना जाधव यांना कन्नड विधानसभा मतदारसंघातून ८४ हजार ४९२ मते मिळाली. वडील निवडणूक प्रमूख आणि दोन्ही मुले विधानसभेत असे चित्र पहिल्यांदा दिसणार आहे. या दोन्ही मतदारसंघात आरक्षण आंदोलनाचे कार्यकर्ते मनोज जरांगे यांचे समर्थक विरोध करतील, असे मानले जात होते. पण प्रत्यक्षात असे काही घडले नाही.

संतोष दानवे यांनी २०१४ मध्ये ८ हजार ७५० मतांनी विजय मिळवला होता. त्यांना ६९ हजार ५९७ मते मिळाली होती. गेल्या वेळी चंद्रकांत दानवे यांना ६२ हजार ८४७ मते मिळाली होती. सातत्याने तेच उमेदवार आणि तीच लढत असे भोकरदनचे स्वरुप होते. मात्र, या वेळी महाविकास आघाडीतील जालना जिल्ह्यातील नेते जरांगे आंदोलनाचा रोष भाजपाविरोधात उमटेल, असे मानून लढत होते. या मतदारसंघात तसे घडले नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या रावसाहेब दानवे यांनी मुलगी संजना जाधव यांना शिवसेना शिंदे गटात पाठवले. विभक्त झाल्यानंतर संजना जाधव यांनी हर्षवर्धन जाधव यांच्या विरोधात निवडणूक लढविली. या मतदारसंघात महिला उमेदवार जाधव यांना लाडक्या बहिणींनी साथ दिली. शिवाय मराठा नेत्यांनी हर्षवर्धन जाधव यांना पुरेसे पाठबळ न दिल्याने संजना जाधव यांचा विजय झाला.

फॉर्म क्र.-३ [पहा नियमन-१५(१)(ए)]/१६(३)

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र.३, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३

दावा क्र. : OA/७००/२०२४ नि.क्र. ११

ऋण वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ चे नियम ५ चे उप-नियम २(A) सह वाचण्यात येणारे कायद्याचे कलम १९ चे उपकलम (४) अंतर्गत समन्स

स्टेट बँक ऑफ इंडिया

विरूद्ध

प्रति, **पांडूरंग ज्ञानोबा शेरे**

१) **पांडूरंग ज्ञानोबा शेरे,** रा.फ्लॅट क्र.एफ-२०, दुसरा मजला, त्रिशा हाईटस्, प्लॉट क्र.०३ ते ०५, गट क्र.७८, पिसादेवी, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१. **येथे सुद्धा :** ४-८-४०६, दुसरा मजला, विष्णू नगर, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१.

२) **मयत अंजली आशिक काजळे,** मयत उर्फ **सौ.अंजली ज्ञानोबा शेरे,** रा.फ्लॅट क्र.एफ-२०, दुसरा मजला, त्रिशा हाईटस्, प्लॉट क्र.०३ ते ०५, गट क्र.७८, पिसादेवी, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१. **येथे सुद्धा :** ४-८-४०६, दुसरा मजला, विष्णू नगर, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१.

समन्स

ज्या अर्थी **OA/७००/२०२४** नामदार पिठासीन अधिकारी/निबंधक यांचे समोर **दि.०१/११/२०२४** रोजी सूचीबद्ध केले होते.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रू.२६,१०,८८३.०४** कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्या विरूद्ध दाखल केलेल्या कायद्याचे कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली.

कायद्याचे कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी विनंती करण्यात आली ती का देण्यात येऊ नये,

(ii) मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मालमत्ता आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबीत असल्याने मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींच्या तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला प्रतिबंधीत करण्यात आले आहे;

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंधी बनवले आहे त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु.क्रमांक ३A अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **दि. २०/१२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **निबंधक यांचे समोर** हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

दि. १२/११/२०२४ रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले.

समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी

स्वाक्षरी/-

निबंधक

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

(स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

SHREE

एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लि. SMFG Grihashakti Nayi Asha. Naya Vishwas.

(पूर्वीची फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कं. लि.)

कॉर्पोरेट कार्यालय: ५०३ व ५०४, ५वा मजला, जी-ब्लॉक, इन्स्पायर बीकेसी, बीकेसी मेन रोड, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-४०००५१. नोंदणीकृत कार्यालय: कमर्शियल क्रिसेंट पार्क, टॉवर "बी", पहिला मजला, नं. १११, माउंट पुनामल्ली रोड, पोरूर, चेन्नई- ६००११६, तामिळनाडू.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) च्या तरतूदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता १५ दिवसीय ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारा **आम जनतेस** आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना देण्यात आली आहे की, याखाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता ("सुरक्षित मत्ता") सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ताब्यात आहे, सदर मालमत्तेचा ताबा **"एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड"**च्या (*पूर्वीची फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड*) (यापुढे "एसएमएचएफसी" म्हणून संदर्भित) (**"सुरक्षित धनको"**) **प्राधिकृत अधिकारी**द्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व हमीदारांकडील **"एसएमएचएफसी"** सुरक्षित धनकोकरिता देय, वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील पुढील व्याज व अन्य खर्च आणि याखाली नमूद केलेल्या देणींच्या वसूलीकरिता याखाली नमूद केलेल्या तारीख व वेळेत **"जसे आहे जेथे आहे"**, **"जसे आहे जे काही आहे"** आणि **"जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

अनु. क्र.	ऋणको/ हमीदारांची नावे/ एलएएन	मालमत्तेचे वर्णन	राखीव किमत (रु'त) / इसारा रक्कम ठेव (रु'त)	ई-लिलावाची तारीख व वेळ	इरठेच्या सादरीकरणाची तारीख
१.	**एलएएन नं.: ६०४९०७५१०२७०३६४, ६०४९०७५१०३६९५२७ १. चंद्रशेखर शिवलाल वरुळे, २. मनिषा चंद्रशेखर वरुळे, ३. सचिन मेन्स पार्लर, ४. जयश्री महेंद्र मंडलिक, ५. सुंदरी ब्युटी पार्लर**	गॅट नं. १३७८/२, प्लॉट नं. ५७, श्रीकृपा हाऊसिंग सोसायटी, धुळे रोड, आर. के. पटेल नगर, अमलनेर, जि. जळगाव- ४२५४०१	१०,१०,०००/- / १,०१,०००/-	१३.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ०१.००	१२.१२.२०२४

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी खालीलप्रमाणे आहेत आणि तपशीलाचीसुद्धा खालील लिंक वेबसाइट पत्त्यावरील आमच्या/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद करण्यात आलेली आहे. (**https://disposalhub.com** व **https://www.grihashakti.com/pdf/E-Auction.pdf**) **स्वारस्य असलेले बोलीदार संपर्क साधू शकतील:** जगदिश पवार, त्यांचा मोबा. नं. : ९४०४८०३०३९, ईमेल: **Jagdish.Pawar@grihashakti.com** व श्री. निलॉय डे, त्यांचा मोबा. नं.: ९९२०६९७८०१, ईमेल: **Niloy.Dey@grihashakti.com**

स्वाक्षरी/-

स्थळ: जळगाव, महाराष्ट्र

दिनांक: २२.११.२०२४

प्राधिकृत अधिकारी, एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड (*पूर्वीची फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लि.*)

जिंतूरमधून मेघना बोर्डीकर, गंगाखेडमधून रत्नाकर गुट्टे दुसऱ्यांदा विजयी

पाथरीत आजी-माजी आमदारांना हरवत विटेकरांची जीत

लोकसत्ता वार्ताहर

मेघना बोर्डीकर | रत्नाकर गुट्टे | राजेश विटेकर

परभणी : जिल्ह्यातील केवळ परभणी विधानसभा मतदारसंघाचा अपवादवगळता पाथरी, जिंतूर, गंगाखेड या तीन मतदारसंघांत महाविकास आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागले. जिंतूरमधून आमदार मेघना बोर्डीकर यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या विजय भांबळे यांचा पराभव केला. गंगाखेड मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाच्या रत्नाकर गुट्टे यांनी उद्धव ठाकरे शिवसेनेचे उमेदवार विशाल कदम यांचा पराभव केला, तर पाथरी येथे झालेल्या बहुरंगी लढतीत आमदार राजेश विटेकर यांनी विजय प्राप्त केला आहे. या मतदारसंघात माजी मंत्री सुरेश वरपुडकर, माजी आमदार बाबाजानी दुर्राणी, शिवसेनेचे बंडखोर सईद खान या उमेदवारांना त्यांनी पराभूत केले.

जिंतूर विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत झाली. भाजपच्या उमेदवार मेघना बोर्डीकर, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे विजय भांबळे, वंचित बहुजन आघाडीचे सुरेश नागरे या तिरंगी लढतीत बोर्डीकर व भांबळे यांच्यात सुरुवातीपासूनच अक्षरशः काट्याची टक्कर होती. प्रत्येक फेरीगणिक या मतदारसंघातील उत्कंठा शीगेला पोहोचली होती. सुरुवातीला भांबळे यांनी काही मतांची आघाडी घेतली. त्यानंतर सहाव्या फेरीअखेर श्रीमती बोर्डीकर यांना मताधिक्य मिळाले. बाराव्या फेरीअखेर भांबळे यांनी मताधिक्य (४,१२०) मिळवले. अठराव्या फेरीपर्यंत ते कायम होते. त्यानंतर श्रीमती बोर्डीकर यांनी आघाडी घेतली. शेवटच्या ३२ व्या फेरीअखेर बोर्डीकर यांना एक लाख १३ हजार ४३२, तर विजय भांबळे यांना १ लाख ८ हजार ९१६ आणि वंचित बहुजन आघाडीच्या सुरेश नागरे यांना ५६ हजार ४७४ एवढी मते मिळाली. ४ हजार ५१६ मतांच्या फरकाने बोर्डीकर यांनी विजय संपादित केला. अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी दुसऱ्यांदा विजय मिळवला आहे.

पाथरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे राजेश विटेकर हे ८३ हजार ७६७ मते मिळवून विजयी झाले आहेत. विटेकर यांनी १३ हजार २४४ मतांच्या फरकाने हा विजय मिळवला. त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसच्या सुरेश वरपूडकर यांना ७० हजार ५२३ मते मिळाली, तर महाविकास आघाडीचे बंडखोर बाबाजानी यांना ४८ हजार २५७ एवढी मते मिळाली. महायुतीतील शिवसेनेचे बंडखोर सईद खान यांना ५४ हजार ६४७ एवढी मते मिळाली. या मतदारसंघातील लढत बहुरंगी असली, तरी शेवटी विटेकर यांनी बाजी मारली. विटेकर यांना नुकतीच विधान परिषदेची आमदारकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आली होती. त्यानंतरही पक्षाने त्यांना पाथरीची उमेदवारी दिली. यात त्यांचा विजय झाला.

गंगाखेड विधानसभा मतदारसंघात सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्ये विशाल कदम यांनी आघाडी घेतली होती. पूर्णा तालुक्याची मतमोजणी होईपर्यंत ही आघाडी कायम होती; मात्र पुढे गंगाखेड तालुक्याची मतमोजणी झाल्यानंतर गुट्टे यांनी जी आघाडी घेतली, त्यावर कदम यांना मात करता आली नाही. शेवटच्या एकतिसाव्या फेरीअखेर महायुतीपुरस्कृत उमेदवार रत्नाकर गुट्टे यांना एक लाख ४१ हजार ५४४, तर विशाल कदम यांना एक लाख १५ हजार २५२ एवढी मते मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार सीताराम घनदाट यांनी ४३ हजार २६ एवढी मते मिळवली. शेवटच्या फेरीत २६ हजार २९२ मतांच्या फरकाने गुट्टे यांनी विजय मिळवला. गंगाखेड मतदारसंघाच्या निवडणुकीत १३ उमेदवार रिंगणात असले, तरी खरी लढत या तीनच उमेदवारांमध्ये झाली. भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी गुट्टे यांच्या प्रचार कार्यावर अघोषित बहिष्कार घालूनही अखेर गुट्टे यांनीच विजय मिळवला.

एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्यूल्ड कमर्शिअल बँक) AU SMALL FINANCE BANK A SCHEDULED COMMERCIAL BANK

नोंदणी. कार्यालय : १९-ए, धुळेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर - ३०२००१ (सीआयएन:एल३६९११आरजे१९९६पीएलसी०११३८१)

परिशिष्ट IV [पाहा नियम ८(I)] ताबा सूचना

ज्याअर्थी, **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्यूल्ड कमर्शिअल बँक)** यांचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ [२००२ चा ५४] नुसार आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सोबत वाचावयाच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना निम्नोल्लेखितप्रमाणे तारखेला डिमांड नोटीस जारी करून कर्जदारांना, खालील सारणीत दिलेल्या तपशीलांनुसार उक्त सूचना मिळावयाच्या तारखेपासून ६० दिवसांत उक्त सूचनेत नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यास फर्मावितेः-

कर्जदाराचे / सह-कर्जदाराचे/ गहाणकर्त्याचे/ हमीदाराचे नाव / कर्ज खाते क्र.	१३(२) नोटिसची तारीख व रक्कम	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन	ताबा घेण्याची तारीख
(कर्ज खाते क्र.) एल९००१०६०८२५९८२९९५ आणि एल९००१०६०१२१५८०६४४, एमके फॅब्रिकेशन, त्यांचे प्रोप्रायटर मुबारक अली सय्यद (कर्जदार), मुबारक अली अमजद अली सय्यद (सह-कर्जदार) यांचेमार्फत.	१२ जुलै २४ रु. २,२२,४९०/- रु. दोन लाख बावीस हजार चारशे नव्वद फक्त आणि रु. ७,७५,८८०/- रुपये सात लाख पंच्याहत्तर हजार आठशे ऐंशी फक्त ११ जुलै २४ रोजी नुसार	मिळकत क्र. १०/२७१, मोहल्ला बडा बंगला, कसबे कन्नड, ता. कन्नड आणि जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र येथे स्थित निवासी / वाणिज्य मालमत्ता जमीन/ इमारत/ बांधकाम आणि फिक्स्चर्स मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे. **क्षेत्रफळ ५७.८९ चौ.मी.** पूर्वेला : शेख कादिर यांची मालमत्ता, पश्चिमेला : सुप्दुबी यांची मालमत्ता, उत्तरेला : सामाईक वापराचा रस्ता, दक्षिणेला : शेख अहमद यांची मालमत्ता	१८ नोव्हेंबर २४

कर्जदाराने रकमेची परतफेड केली नाही त्यामुळे कर्जदाराला आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, वरील सारणीत नमूद केलेल्या तारखेला निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त नियमांच्या नियम ८ सोबत वाचावयाच्या उक्त [अधिनियम २००२]च्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून येथील उपरोल्लेखित सारणीत वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

"प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (८)च्या उपबंधांकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे."

विशेषतः कर्जदाराला व सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, या मालमत्तेचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये आणि या मालमत्तेचा कोणताही खरेदी-विक्री व्यवहार हा वरील सारणीत नमूद केलेली रक्कम व त्यावरील व्याज अशा रकमेकरिता दी **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्यूल्ड कमर्शिअल बँक)** यांच्या भारासापेक्ष राहील.

स्वाक्षरी/-

दिनांक : २२.११.२०२४, स्थळ : औरंगाबाद

प्राधिकृत अधिकारी, एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन: U67100TZ2014PTC020363

कॉर्पोरेट कार्यालय: कोहिनूर स्क्वेअर, सत्तेचाळीसावा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई- ४०००२८. टेलि.: ०२२-६९२३११११, **मोबा.:** ९७६९१७०७७४

[जोडपत्र-IV-ए] [नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६) ची तरतूद पाहावी]

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे आम जनतेस आणि खास करून **संतोष गंगाराम राठोड (कर्जदार) दीपा संतोष राठोड (सह-कर्जदार) मेवाड भवन शुद्ध शाकाहारी भोजनालय (सह-कर्जदार)** यांना सूचित करण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा सुरक्षित धनको ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (OARPL) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दि. ३०.०५.२०२२ रोजी ताबा घेतलेला असून तिची सुरक्षित धनको मे. ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना वर नमूद कर्जदार व सह-कर्जदार यांचेकडून घेणे असलेल्या दि. ३०.११.२०२० नुसार रु.२१,८३,१५२/- (रुपये एकवीस लक्ष त्र्याऐंशी हजार एकशे बावन्न फक्त) अधिक दि. ०१.१२.२०२० पासूनचे पुढील व्याज एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी **दि. १२.१२.२०२४ रोजी दु. ०१.०० ते २.०० वाजेपर्यंत** (बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे **११.१२.२०२४ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत**) "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे" आणि "उपाय नाही" तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (पीएस २२/२०२०-२१ ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) यांनी दि. २६.०२.२०२१ रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये सदर कर्जदार/ जामिनदारांच्या विरूद्ध असलेली सर्व थकबाकी कर्जे त्यामधील अंतर्निहित अनामतींसह फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्याकडून अधिग्रहित केली आहेत.

अचल मालमत्तेचे वर्णन, आरक्षित किंमत, बयाणा रक्कम, आणि ज्ञात बोजे इ. पुढीलप्रमाणे आहेत:

मालमत्तेचे वर्णन: सदनिका क्र. ०२, पहिला मजला, प्लॉट क्र. ५८, गट क्र. २६, कृपाश्री अपार्टमेंट, इतखेडा फलटण रोड, औरंगाबाद- ४३१००१, क्षेत्रफळ सुमारे २८८ चौ.मी. **चतुःसीमा: पूर्वेस-** मोकळी जमीन, **पश्चिमेस-** सदनिका क्र. ३, **उत्तरेस-** बाजू, **दक्षिणेस-** रस्ता.	
आरक्षित किंमत- रु.१८,००,०००/-	**बयाणा रक्कम-** रु.१,८०,०००
ई-लिलावाचा दिनांक- १२.१२.२०२४ रोजी दु. १.०० ते २.०० वाजेपर्यंत	
किमान बोलीवृद्धी रक्कम- रु. २०,००० (रुपये वीस हजार फक्त)	
सहभागासाठी बोली पत्र/ केवायसी दस्तावेज/ बयाणा रकमेच्या भरण्याचा पुरावा सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ- ११.१२.२०२४ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत	
पाहणीचा दिनांक- ०५.१२.२०२४ रोजी दु. १२.०० ते ०२.०० वाजेपर्यंत (आधी निश्चिती करून)	
ज्ञात बोजे - ज्ञात नाहीत	

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६) अंतर्गत कर्जदार/ सह-कर्जदारांसाठी असलेली 'तीस दिवसांची' सूचनादेखील आहे.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर **http://omkaraarc.com/auction.php** येथे दिलेली लिंक पाहावी आणि प्राधिकृत अधिकारी राजेंद्र देवर्डे प्रकरण अधिकारी: **तानाजी मांडवकर फोन क्र. ९३२४५४६६५१- ९७६९१७०७७४ आणि ईमेल- rajendra.dewarde@omkaraarc.com, संपर्क क्र. ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्डे ९३२४५४६६५१ आणि ईमेल- tanaji@omkaraarc.com** येथे संपर्क साधावा. बोलीदार वेबसाइटला **http://www.bankeauction.com** येथे किंवा सेवा पुरवठादारांशी मे. सी१ इंडिया प्रा. लि. टेलि. हेल्पलाइन: +९१ ७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी: **support@bankeauctions.com, श्री भाविक पंड्या, मोबाइल: ८८६६६८२९३७, ईमेल: Maharashtra@c1india.com** येथे सुद्धा संपर्क साधू शकतात. इच्छुक बोलीदारांनी नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ मधील अनुच्छेद २९ए चे पालन करावे आणि त्या अंतर्गत शपथपत्र द्यावे.

स्वा/-

दिनांक: २४.११.२०२४

स्थान: औरंगाबाद

प्राधिकृत अधिकारी, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.

(ओमकारा पीएस २२/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)

HDFC BANK We understand your world

रजि. ऑफिस : एच.डी.एफ.सी. बँक लि., एच.डी.एफ.सी. बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (प.), मुंबई ४०० ०१३.

पत्ता: एचडीएफसी बँक लि., रिटेल पोर्ट फोलिओ मॅनेजमेंट, ३ रा मजला, लँड मार्क बिल्डिंग, गोरक्षण रोड, जुने आयटी स्क्वेअर, अकोला - ४४४ ००४.

ताबा नोटीस (नियम ८(१) नुसार स्थावर मालमत्ता)

खाली सही करणारे **एच.डी.एफ.सी. बँक लि.**चे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायजेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, २००२ सोबत वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) च्या अंतर्गत कलम ९ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून पाठविलेल्या नोटीसीनुसार संबंधीत कर्जदार/सहकर्जदार यांना कलम १३ (२) मध्ये नमूद केलेली रक्कम संबंधीत नोटीस मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.

परतुं संबंधीत कर्जदारांना संबंधीत रक्कम परत करण्यात अपयश आल्याने याद्वारे विशेषत: संबंधीत कर्जदार व सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, दिलेल्या नियमाच्या नियम ९ सोबत वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम (१३)४ अंतर्गत मिळणाऱ्या अधिकारांचा वापर करून मालमत्तेचा **प्रतिकात्मक ताबा** घेतलेला आहे.

विशेषत: संबंधित कर्जदार व सर्वसाधारण जनतेला सूचित करण्यात येते की, संबंधित मालमत्तेचे कोणतेही व्यवहार करू नयेत व खाली दिलेल्या मालमत्तेचे असे व्यवहार केल्यास ते खाली दिलेल्या रकमेसाठी त्यावरील निर्धारित व्याजासह **एच.डी.एफ.सी. बँक लि.** च्या आधीन असतील.

अ. क्र.	कर्जदार व सहकर्जदार यांची नावे	कर्ज खाते नं.	प्रतिकात्मक ताबा घेतलेल्या सुरक्षित तारण / गहाण मालमत्तेचा तपशील	१३(२) नुसार नोटीस तारीख	नोटीस रक्कम (रू.)	प्रतिकात्मक ताबा तारीख
१.	**मे. व्यंकटेश कृषी केंद्र,** तर्फे तिचे प्रोप्रायटर - **जगदिश राधेशाम लोया,** मौजे शेणगांव, तहसिल कार्यालयाजवळ, लक्ष्मी नगर, आजेगाव रोड, शेणगांव, ता. शेणगाव, जि. हिंगोली. **जगदिश राधेशाम लोया,** **रा.** - जी. क्र. ५, मेन रोड, शेणगाव, ता. शेणगांव, जि. हिंगोली.	५०२०००२४ १७५८१८ आणि ८१८६८५९	मौजे शेणगांव, लक्ष्मी नगर, तहसिल कार्यालयाजवळ, आजेगाव रोड, शेणगांव, ता. शेणगाव, जि. हिंगोली येथील सर्व्हे क्र. २७६ मधील लेआऊट प्लॉट नं. ५१ ही तेथील सर्व हक्क, अधिकार आणि सुधारणांसह असलेली रहिवासी इमारतीची मिळकत.	१९ जानेवारी, २०२४	१२/०१/२०२४ पर्यंतची रक्कम **४६,०७,७६१/-**	१९ नोव्हेंबर, २०२४

दिनांक: २२.११.२०२४

स्थळ : अकोला.

(इंग्रजी नोटीसीचे हे भाषांतर असून अर्थबोध होण्यासाठी इंग्रजी मसुदाच ग्राह्य धरण्यात येईल.)

सही/-

अधिकृत अधिकारी, एच.डी.एफ.सी. बँक लि.

JPPL-24

लातूर जिल्ह्यात अमित देशमुख वगळता पाच मतदारसंघात महायुतीचा विजय

प्रदीप नणंदकर, लोकसत्ता

लातूर : लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी लातूर शहर विधानसभा मतदारसंघात विलासराव देशमुख यांचे ज्येष्ठ सुपुत्र अमित देशमुख विजयी झाले. लातूर ग्रामीण मधून विलासराव देशमुख यांचे कनिष्ठ सुपुत्र धीरज देशमुख यांच्यासह उर्वरित पाच मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार पराभूत झाले.

लातूर शहर विधानसभा मतदार संघातून अमित देशमुख यांनी भाजपच्या अर्चना पाटील चाकूरकर यांच्यावर नऊ हजार मतांची आघाडी घेत त्यांचा पराभव केला. लातूर ग्रामीण मतदार संघातून भाजपचे विधान परिषद सदस्य रमेश कराड यांनी विलासराव देशमुखांचे कनिष्ठ सुपुत्र आमदार धीरज देशमुख यांचा सात हजारांपेक्षा अधिक मतांनी पराभव केला. उदगीर विधानसभा मतदारसंघातून राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे हे ९२ हजार ७०० पेक्षा अधिक मताधिक्य घेत शरद पवार गटाचे माजी आमदार सुधाकर भालेराव यांचा दारुण पराभव केला. अहमदपूर विधानसभा मतदारसंघात आमदार बाबासाहेब पाटील यांनी जनसुराज्य पक्षाचे गणेश हाके यांचा ३१ हजार मतांनी पराभव केला. निलंगा विधानसभा मतदारसंघातून भाजपचे आमदार संभाजी पाटील हे चौथ्यांदा विजयी झाले त्यांनी काँग्रेसचे अभय साळुंखे यांचा १३ हजार ७४० मतांनी पराभव केला. औसा विधानसभा मतदारसंघातून भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांनी शिवसेना उबाठाचे माजी आमदार दिनकर माने यांचा ३५ हजार मतांनी पराभव केला.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी दोन ठिकाणी काँग्रेस दोन ठिकाणी (राष्ट्रवादी- अजित पवार) तर दोन ठिकाणी भाजपा निवडून आले होते. यावेळी अजितदादा गटाचे दोन ठिकाणी तर भाजपचे तीन ठिकाणी आमदार निवडून आले आहेत. तर काँग्रेसला लातूर ग्रामीण मधून पराभव पत्करावा लागला.

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

भविष्यविषयक

अॅस्ट्रोलॉजी- गोल्ड मेडेलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्रांचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमध्ये लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचविते व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. 9820553276/ 9820612578. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाही.)

0070923966-2

मालमत्तासंबंधी

Kokan - Nivati Beach. Seashore touch. 66 Guntha plot. Contact 9833101928 / mobilecommerce@gmail.com <mailto:mobilecommerce@gmail.com>. Clear Title. Price 3.5 Cr. Broker Excuse.

0050254950-1

यात्रासहल

दोस्ती टूर * आसाम- अरुणाचल- मेघालय * नर्मदापरिक्रमा * केरळ- तामिळनाडू * अमृतसर- डलहौसी * त्रिस्थळी- अयोध्यासह * कुरवपूर- पिठापुरम * नेपाळ * मुक्तीनाथ- जनकपुरसह * दुबई * श्रीलंका 9594880123/ 8828224121.

0070915287-8

महत्त्वपूर्ण निवेदन

[illegible]

फॉर्म क्र.-३ [पहा नियमन-१५(१)(ए)]/१६(३)

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र.३, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३

दावा क्र. : OA/६४६/२०२४ नि.क्र. ११

ऋण वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ चे नियम ५ चे उप-नियम २(A) सह वाचण्यात येणारे कायद्याचे कलम १९ चे उपकलम (४) अंतर्गत समन्स

स्टेट बँक ऑफ इंडिया

विरूद्ध

प्रति, **अमोल सुधाकर डांगरे**

१) **अमोल सुधाकर डांगरे,** रा.घर क्र.४-१८-३४, गाधनगर, सिंधी कॉलनी, टोळी चौकी, छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१. **येथे सुद्धा :** रो-हाऊस क्र.२, पश्चिम बाजू, गट क्र.८१, देवळाई रोड, छत्रपती संभाजीनगर (पुर्वी औरंगाबाद म्हणुन ओळखले जायचे), महाराष्ट्र-४३१००१.

२) **संतोष सुधाकर डांगरे,** रा.फ्लॅट क्र.५-१, बालाजीनगर, सौजन्य नगर, टोळी चौकी, छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर (पुर्वी औरंगाबाद म्हणुन ओळखले जायचे). **येथे सुद्धा :** रो-हाऊस क्र.२, पश्चिम बाजू, गट क्र.८१, देवळाई रोड, छत्रपती संभाजीनगर (पुर्वी औरंगाबाद म्हणुन ओळखले जायचे), महाराष्ट्र-४३१००१.

समन्स

ज्या अर्थी **OA/६४६/२०२४** नामदार पिठासीन अधिकारी/निबंधक यांचे समोर **दि.०७/११/२०२४** रोजी सूचीबद्ध केले होते.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रू.२८,३५,६४७/-** कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्या विरूद्ध दाखल केलेल्या कायद्याचे कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली.

कायद्याचे कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी विनंती करण्यात आली ती का देण्यात येऊ नये,

(ii) मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मालमत्ता आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबीत असल्याने मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींच्या तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला प्रतिबंधीत करण्यात आले आहे;

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंधी बनवले आहे त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु.क्रमांक ३A अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **दि. २३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **निबंधक यांचे समोर** हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

दि. ११/११/२०२४ रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले.

समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी

स्वाक्षरी/-

निबंधक

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

(स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

SHREE

हिंगोलीत तीनही मतदारसंघात महायुतीचा वरचष्मा

हिंगोली : जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघात महायुतीचा विजय झाला असून, वसमतमध्ये राजेश नवघरे, कळमनुरीत संतोष बांगर तर हिंगोलीत तान्हाजी मुटकुळे यांनी विजय मिळविला आहे.

हिंगोलीतून भाजपाचे आमदार तान्हाजी मुटकुळे यांना ७३ हजार ७२४ मतदान मिळाले तर ठाकरे गटाच्या रुपाली पाटील गोरेगावकर यांना ६२ हजार ७०३ मतदान मिळाले. आमदार मुटकुळे यांनी १२ हजारांपेक्षा अधिक मतांनी विजय मिळविला.

वसमत मतदारसंघात विद्यमान आमदार राजेश नवघरे यांनी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचा २९ हजार मतांनी पराभव केला. विशेष म्हणजे वसमत शहर वगळता संपूर्ण मतदारसंघात नवघरे यांना आघाडी मिळाली आहे. आमदार नवघरे यांना १ लाख ५ हजारपेक्षा अधिक मतदान मिळाले तर दांडेगावकर यांना ७६ हजार पेक्षा अधिक मते मिळाली आहेत. तर, गुरू पादेश्वर महाराज यांना ३४ हजार पेक्षा अधिक मते मिळाली आहे.